कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम-२०१३ मधील तदतुदीनुसार अंतर्गत तक्रार समितीची पुर्नरचना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६२/का-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १५/०३/२०१९.

वाचा:-

१) महिला व बाल विकास विभाग, आदेश क्र.आस्था-२००९/प्र.क्र.१९४/का-०१, दि.३.१२.२००९
२) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.आस्था-२०१२/प्र.क्र.१७२/का-१, दि. ७.८.२०१२
३) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/का-१, दि. १९.६.२०१४
४) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.आस्था-२०१४/प्र.क्र.२१९/का-१,दि. २९.११.२०१४
५) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६२/का-१,दि.१६.०३.२०१६
६) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६२/का-१,दि.०१.०९.२०१७

प्रस्तावना:-

केंद्र शासनाकडून कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम दि. २३ एप्रिल, २०१३ व त्याअंतर्गत दि.९ डिसेंबर, २०१३ रोजी नियम प्रसिध्द करण्यात आलेले असून प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्याबाबत शासन निर्णय दि. १९ जून, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ५ अन्वये या विभागात अंतर्गत तक्रार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचे सदस्य यांनी यांनी स्वेच्छासेवानिवृत्त झाल्यामुळे समितीची पुर्नरचना करण्याचे प्रस्तावित होते.

शासन निर्णय:-

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत या विभागामध्ये खालीलप्रमाणे अंतर्गत तक्रार समितीची पुर्नरचना करण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीमधील अध्यक्ष/सदस्यांची नावे	पदनाम
१	श्रीम.स्मि.द.निवतकर, उप सचिव	अध्यक्ष
२	श्रीम.व.अ.साखरे, अवर सचिव (विधी)	सदस्य
३	श्रीम.सं.सु.गवस, कक्ष अधिकारी	सदस्य
४	श्री.द.पां.जाधव, कक्ष अधिकारी	सदस्य
५	ॲड पुजा कुटे, मजलिस संस्था,मुंबई	अशासकीय सदस्य
६	श्रीम.कां.सं.जगताप, कक्ष अधिकारी	सदस्य सचिव

या विभागातील काम करणाऱ्या महिला कर्मचा-यांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी लैंगिक छळासंदर्भात कोणतीही तक्रार असल्यास ती अंतर्गत समितीचे अध्यक्ष किंवा सदस्य सचिव किंवा अंतर्गत तक्रार समितीच्या नावे सादर करावी.

सदर महिला तक्रार समितीचे कामकाज पुढीलप्रमाणे चालेल:-

१. केंद्र शासनाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम दि. २३ एप्रिल, २०१३ व त्याअंतर्गत दि. ९ डिसेंबर, २०१३ रोजी नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. यामधील तरतुदींनुसार महिलांच्या लैंगिक छळवणुकीस आळा घालण्यासाठी व कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

२. विभागाच्या स्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारींची निर्धारीत कालावधीमध्ये छाननी करणे व तक्रारींच्या अनुषंगाने योग्य त्या प्राधिका-यांकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणे.

३. लैंगिक छळवणुकीसारखे प्रकार टाळण्यासाठी जागृती निर्माण करणे तसेच समितीच्या नियतकालिक बैठका घेऊन सुरक्षित वातावरणाच्या निर्मितीबाबत खात्री करणे.

४. सदर ॲक्ट मधील तरतुदीनुसार वार्षिक अहवाल तयार करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४०८१५०३५९७१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.04.08 15:08:41 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अध्यक्ष,सदस्य व सदस्य सचिव, अंतर्गत महिला समिती, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) ॲड पुजा कुटे, B-२३ मे. फेअर गार्डन, लिटिल गिब्ज रोड, मलबार हिल, मुंबई-४००००८.

प्रत माहितीसाठी

१) सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) सचिव यांचे स्वीय सहायक, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) निवड नस्ती कार्यासन -१.